# महाराष्ट्र शासन


दूरध्वनी क्र. ०२२- २२७९३९२४

Email: **ramesh.sarfare74@nic.in**


क्रमांक No. : एबाविं-२०१८/प्र.क्र.२१४/का.०५


**महिला व बाल विकास विभाग**

नविन प्रशासन भवन, ३ रा मजला , मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई - ४०० ०३२.


दिनांक:- २७ ऑगस्ट २०१८

प्रति,

अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
अपर मुख्य सचिव,पाणी पुरठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव,अन्न व औषध प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक,ग्रामीण जीवनउन्नोती संचालनालय (MSRLM)
महासंचालक,महिला आर्थिक विकास महामंडळ,मुंबई
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई.
संचालक, राजमाता जिजाऊ माता व बाल आरोग्य पोषण मिशन, मुंबई.
सह संचालक (श्रीमती अर्चना पाटील) सार्वजनिक आरोग्य महासंचालनालय, पुणे.
सर्व विभागीय उपायुक्त ( महिला व बाल विकास)
सर्व महिला व बाल विकास अधिकारी ( जिल्हा परिषद)
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी ( नागरी प्रकल्प)

**विषय :- मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित व्हिडीओ कॉन्फरस.**
**दिनांक २८ ऑगस्ट २०१८ सकाळी ११.०० वाजता**

महोदय,

केंद्र शासनाने माहे सप्टेंबर २०१८ हा महिना पोषण महिना (सही पोषण ,देश रोशन, प्रत्येक घर पोषण उत्सव) म्हणून साजरा करण्याबाबत सर्व राज्यांना कळविले आहे. केंद्रिय मा.मंत्री ( म.व बा.वि.) आणि निती आयोगाच्या उपाध्यक्ष तसेच विविध विभागांचे केंद्रिय सचिव यांच्या उपस्थितीत दिनांक २३ ऑगस्ट २०१८ रोजी डॉ.आंबेडकर हॉल, १५जनपथ नवी दिल्ली येथे सर्व राज्यांची १ दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेत **दिनांक १ सप्टेंबर २०१८ ते ३० सप्टेंबर २०१८** या कालावधीत सर्व राज्यात पोषण महिन्यामध्ये कोणकोणते कार्यक्रम व उपक्रम खालील विविध विभागानी राबविण्यात यावेत तसेच माहिती व जनसंपर्क यांच्या माध्यमातुन त्यास व्यापक प्रसिध्दी देऊन जनमानसापर्यंत योग्य पोषण हा विषय पोहचविण्याकरिता कृती कार्यक्रम व वेळापत्रक तयार करुन देण्यात आलेले आहे.

२. पोषण अभियान कार्यक्रम पुढील विभागांच्या अभिसरण व समन्वयातून राबवावयाचा आहे १ ) ग्राम विकास विभाग (पंचायत राज), २) सार्वजनिक आरोग्य विभाग ३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग ४) माहिती व जनसंपर्क विभाग ५) शालेय शिक्षण विभाग ६) आदिवासी विकास विभाग ७) अन्न व औषध प्रशासन विभाग.

३. पोषण अभियानाशी संबधित विभागांनी पोषण महिना कार्यक्रमात सहभागी होऊन आपल्या विभागांमार्फत व अधिनस्त यंत्रणा व क्षेत्रिय अधिकारी /कर्मचारी यांच्या सक्रीय सहभागातून जिल्हास्तर /गटस्तर /ग्रामस्तरावर विविध कार्यक्रम/उपक्रम आयोजनाबाबत मार्गदर्शन व सूचना करण्याकरिता **मा.मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ ऑगस्ट २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता त्यांच्या मंत्रालयातील समिती कक्षात ६ वा मजला येथे व्हिडीओ कॉन्फरसव्दारे चर्चा आयोजित केलेली आहे.** (MSWAN व्हिडीओ कॉन्फरस यंत्रणा)

सप्टेंबर-२०१८ पोषण महिन्यातील कार्यक्रम कृती आराखडा

| अ. क्र. | पहिला आठवडा | दुसरा आठवडा | तिसरा आठवडा | चौथा आठवडा | २ आक्टोबर |
|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष ग्रामसभेचे आयोजन आणि माहिती व प्रसिध्दी साहित्याचे वाटप | ग्राम आरोग्य स्वच्छता पोषण दिवस (VHSND ) आयोजन | जिल्हास्तर/विभागीयस्तरावर पोषण मेळाचे आयोजन, ( यामध्ये आरोग्य व पोषण या विषयाचे प्रदर्शन, सदृढ बालक स्पर्धा, विविध फळांच्या पोषाकासह बालकांची फॅनशी ड्रेस स्पर्धा ,स्ट्रीट प्ले,शालेय निबंध स्पर्धा यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींचा सहभाग, रक्तक्षय मुक्त भारत,बेटी बचाओ,बेटी पढाओ या विषयावर स्टॉल, ग्राम बाल विकास केंद्रचे आयोजन | समुदाय आधारित कार्यक्रम (CBE चे आयोजन) | ग्रामसभा |
| २ | प्रभातफेरी | महिलांसाठी योगा आयुष मार्फत | | प्रभातफेरी | |
| ३ | पोषण विषयावर शाळेमध्ये चित्रफीत दाखवणे | ANM/आशा वर्कर/अंगणवाडीसेविका/स्वयंसहाय्यता बचत गट यांची एकत्रित IYCF आणि चांगल्या आरोग्यच्या सवयी बाबत लोकजागृती होण्याकरिता एकत्रित गृहभेट | | ANM/आशा वर्कर/अंगणवाडीसेविका/स्वयंसहाय्यता बचत गट यांची एकत्रित IYCF आणि चांगल्या आरोग्यच्या सवयी बाबत लोकजागृती होण्याकरिता एकत्रित गृहभेट | |
| ४ | ० ते ६ वयोगटातील बालकांचे वजन घेणे व छाननी करणे | ० ते ६ वयोगटात बालकांचे वजन घेणे छाननी करणे | | ० ते ६ वयोगटातील बालकांचे वजन घेणे व छाननी करणे | |
| ५ | जिल्हा /उप विभागीयस्तरावर अभिसरण कृती आराखडा तयार करणे | अंगणवाडी केंद्र इमारतीतील शौचालयाकरिता पाण्याची सुविधा उपलब्ध करणे | | किशोरवयीन मुलींकरिता जनजागृती शिबिराचे आयोजन | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | सर्व शाळांमध्ये योग्य आहाराचे सेवन करणे याबाबत मार्गदर्शन करणे | शाळांमध्ये हात धुण्याकरिता वॉश बेसिन सुविधा उपलब्ध करुन देणे | | | |
| ७ | | सॅनिटरी नॅपकीन व्हेडिंग मशिन उपलब्ध करुन देणे.अस्मिता योजनेतर्गत सॅनिटरी पॅडचा पुरवठा करणे | | महिलांसाठी योगा आयुष मार्फत | |
| ८ | ग्रामस्तरावर बेटी बेटा सांख्यिकी आकडेवारी दर्शविणारा फलक लावणे | गट तसेच ग्रामस्तरावर अभिसरणकृती आराखडा तयार करण्यासाठी बैठक आयोजित करणे | | जिल्हास्तरावर अभिसरणकृती आराखडयाबाबत आढावा आणि अहवालाचे एकत्रिकरण | |
| ९ | बेटी बचाओ, बेटी पढाओ अभिसरण कृती आराखडा बैठकीचे आयोजन | बेटी बचाओ, बेटी पढाओ कार्यक्रम | | बेटी बचाओ, बेटी पढाओ कार्यक्रम अभिसरणकृती आराखडयाबाबत आढावा आणि अहवालाचे एकत्रिकरण | |
| १० | महिला ई शक्ती कार्यकम, एनएसएस/ नेहरु युवा केद्र स्वयंसेवक / माविम स्वयंसहाय्यता बचतगट यांचे सहकार्याने | महिला ई शक्ती अतर्गत पात्र महिलांना महिला कल्याणकारी योजनांचा लाभ देणे | | | |

४. उपरोक्त व्हिडीओ कॉन्फरससाठी आपण स्वत: उपस्थित रहावे,अशी विनंती आहे. तसेच आपल्या विभागातील जिल्हास्तरीय अधिकारी यांना जिल्हास्तरावरील व्हिडीओ कॉन्फरसव्दारे चर्चेसाठी उपस्थित रहाण्याबाबत सूचना द्याव्यात. जिल्हाधिकारी, व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद ) यांनी स्वत: व्हिडीओ कॉन्फरसाठी उपस्थित रहाण्याबाबत मा.मुख्य सचिव यांच्या सूचना आहेत.

आपला

( ला.रा.गुजर )
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
अपर मुख्य सचिव (म.व बा.वि.) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई